महानिर्मिती कंपनीच्या कोराडी संच क्र. ६ च्या कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजित खर्चासाठी व अतिरिक्त भाग भांडवलासाठी मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०१८/प्र.क्र.५३/ऊर्जा-४

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : ०७ मार्च, २०१९

<u>वाचा :</u>- १) शासन निर्णय क्रमांक - जाबँक-२०१०/प्र.क्र.११३/ऊर्जा-३, दिनांक ३०.०४.२०११

२) महानिर्मिती कंपनी यांचे पत्र क्रमांक- CMD/P&P/R&M/Koradi U#६/Revised Cost/०११८, दिनांक २५ जानेवारी, २०१८

३) शासन निर्णय क्र. निधीवि-२०१७/प्र.क्र.११२(१)/ऊर्जा-३, दिनांक ३१.०३.२०१८

४) शासन निर्णय क्र. निधीवी-२०१७/प्र.क्र. ११२(३)/ऊजा-३, दिनांक ३१.०३.२०१८

५) शासन निर्णय क्र. निधीवी-२०१७/प्र.क्र. ११२(६)/भाग(३)/ऊजा-३, दिनांक ३१.०३.२०१८

६) शासन निर्णय क्र. निधीवी-२०१७/प्र.क्र. ११२(७)/भाग(३)/ऊजा-३, दिनांक ३१.०३.२०१८

७) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. CE/P&P/EE R&M/Koradi U#६/Revised Cost/०२०२, दिनांक २०.०२.२०१९ चे पत्र

<u>प्रस्तावना :</u>

जागतिक बँकेच्या वित्त पुरवठा योजने अंतर्गत भारत सरकारच्या: कोळशावर आधारीत वीज निर्मिती केंद्राचा पुनर्वसन प्रकल्पानुसार महानिर्मितीच्या कोराडी संच क्र. ६ चे कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्याचे ठरविले आहे. [प्रकल्प क्र. P-१००१०१, आय.बी.आर.डी. क्र.७६८७-IN आणि जी.ई.एफ. (जागतिक वातावरण सुविधा) अनुदान क्र. TF०९४६७६]. सदर प्रकल्पासाठी आय.बी.आर.डी. बँकेकडून ५८,८५२,५०० अमेरिकन डॉलर एवढे कर्ज आणि १२,४५०,००० अमेरिकन डॉलर इतके जी.ई.एफ. (जागतिक वातावरण सुविधा) अनुदान मंजूर करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. जाबँक-२०१०/प्र.क्र.११३/ऊर्जा-३, दि. ३०.०४.२०११ अन्वये सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी अंदाजित किंमत रु. ४८६ कोटी व महाराष्ट्र शासनाकडून रु. ९६ कोटीच्या भागभांडवलासाठी मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र वीज नियामक मंडळाने पत्र

क्र.एमईआरसी/कॅपेक्स/०००३६४, दि. २४.०५.२०१० द्वारे कोराडी संच क्र.६ कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरणला मंजुरी दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्प उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून सदर संचाच्या उभारणी खर्चात वाढ झाल्यामुळे सुधारित खर्चास व वाढीव भागभांडवलास मंजुरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीनन होता.

शासन निर्णय :

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी संच क्र. ६ च्या कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजित खर्चास व अतिरिक्त भाग भांडवलास मान्यता मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीकडून उपरोक्त क्र. २ येथील पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव दिनांक ०५.०३.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यावर मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

१. महानिर्मिती कंपनीच्या कोराडी संच क्र. ६ च्या कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पाचा एकूण सुधारित खर्च रुपये५६३.१२ कोटी व त्यामधील शासनाचे भाग भांडवल रुपये ११२.६२कोटी यास शासनाची खालीलप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(रु. कोटीत)

अ.क्र.	तपशिल	एकूण प्रकल्प खर्च	जागतिक बँकेकडून घेतलेले कर्ज (साधारणतः ६०%) आणि अनुदान (साधारणतः १४%) = एकूण (७४%)	महानिर्मितीचा वाटा (साधारणतः ६%)	शासनाचे भागभांडवल (२०%)
१.	शासनाने मान्यता दिल्यानुसार मूळ प्रकल्प खर्च	४८६.०७	३६०.००	३०.००	९६.००
२.	महानिर्मितीच्या प्रस्तावाप्रमाणे सुधारित प्रकल्प खर्च	५६३.१२	३६०.००	९०.४३ (*)	११२.६२
३.	वाढीव खर्च	७७.०५	---	६०.४३	१६.६२

* प्रकल्पाची सुधारित किंमत रु. ६०६.८६ कोटी ऐवजी कमी होऊन रु. ५६३.१२ कोटी इतकी झाली. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे भागभांडवल, महानिर्मितीचा वाटा आणि जागतिक बँकेकडून वित्तसहाय्य यांचे वाटे प्रमाणितपणे कमी झाले. परंतु २९.०३.२०१८ नंतर जागतिक बँकेकडून वित्तसहाय्य होणार नसल्यामुळे ती रक्कम महानिर्मितीच्या वाट्यात समाविष्ट करण्यात आली आहे.

२. सदर प्रकल्पाच्या सुधारित खर्चानुसार रुपये ७७.०५ कोटी इतक्या वाढीव खर्चाच्या रक्कमेतील रुपये ६०.४३ कोटी अंतर्गत स्त्रोतातुन उभारण्यास महानिर्मिती कंपनीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे आणि सुधारित प्रकल्प खर्चापोटी देय

असलेल्या २०% भागभांडवलाच्या रुपये१६.६२ कोटी एवढी रक्कम शासनाकडून महानिर्मिती कंपनीस देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबींवरील खर्च मागणी क्र. के-६ प्रधान लेखाशिर्ष - २८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०५ औष्णिक विद्युत निर्मिती १९९ सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (००) (००) (०१) कोराडी संच क्र. ६ च्या कार्यक्षम नूतनीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक(२८०१ २८७६) ३१ गुंतवणूक या लेखाशिर्षाखाली प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून उपरोक्त संदर्भ क्र. ३, ४, ५ व ६ येथील शासन निर्णयान्वये शासकीय भागभांडवलाची रक्कम महानिर्मिती कंपनीस अदा करण्यात आली आहे.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७१/१४६१, दिनांक ३०.१०.२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३१/२०१८, दिनांक १७.०१.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३०७१७१५५४९७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Uddhav Dattatraya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e52cab4406cc0eafdac51ee7f716de23ff575342e86fcb658bbfd2de90eba24, cn=Uddhav Dattatraya Walunj
Date: 2019.03.07 17:18:20 +05'30'

(उ. द. वाळुंज)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (ऊर्जा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (ऊर्जा) मंत्रालय, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१४ निवासी लेखाधिकारी, मुंबई

१५. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई

१६. मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई

१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

२१. वित्त विभाग (व्यय-१६)

२२. नियोजन विभाग (कार्यासन-१४६१)

२३. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने

२४. निवड नस्ती (ऊर्जा-४)